# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः06.07.2026** **वारःसोमवार**

---

1. पंतप्रधान नरेंद्र मोदी आजपासून तीन दिवसांच्या इंडोनेशिया, ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंड दौऱ्यावर रवाना होणार
2. केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांच्या हस्ते आज सहकार क्षेत्रातील विविध उपक्रमांची पायाभरणी
3. महिला टी-20 विश्वकरंडक स्पर्धेत ऑस्ट्रेलियाचा संघ विश्वविजेता आणि
4. महाराष्ट्रात मुंबई पुण्यासह विविध जिल्ह्यात पावसाचा कहर केरळमध्ये आज अतिमुसळधार पावसाचा इशारा

**पंतप्रधान-इंडोनेशिया**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आजपासून सहा दिवसांच्या इंडोनेशिया, ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंड दौऱ्यावर जात आहेत. पहिल्या टप्प्यात ते इंडोनेशियाला भेट देतील. उभय देशांमध्ये सर्वसमावेशक धोरणात्मक भागीदारी पातळीवरील संबंध प्रस्थापित झाल्यानंतर दोन्ही नेत्यांची पहिलीच द्विपक्षीय भेट आहे. या भेटीत ते इंडोनेशियाचे राष्ट्राध्यक्ष प्रबोवो सुबियांतो यांच्याशी चर्चा करतील. तसेच योग्याकार्ता या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक शहराला मोदी भेट देणार आहेत. तिथल्या प्रम्बनन मंदिराच्या संवर्धनाच्या कार्यात उभय देश सहकार्य करणार आहेत. पंतप्रधान भारतीय समुदायाला संबोधितही करणार आहेत. त्यानंतरच्या दोन टप्प्यात पंतप्रधान आठ तारखेला ऑस्ट्रेलियाच्या आणि 10 ते 11 जुलै दरम्यान न्यूझीलंडच्या दौऱ्यावर जाणार आहेत.

**शहा सहकार**

सहकार मंत्रालयाच्या पाचव्या स्थापना दिनानिमित्ताने आज केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शहा यांच्या हस्ते देशभरातल्या अनेक महत्त्वाच्या सहकार उपक्रमांची पायाभरणी आणि उद्घाटन होणार आहे. त्यामध्ये 232 धान्य साठवण गोदामांचे उद्घाटन, सहकार वन भूमीपूजन, महाराष्ट्र आणि उत्तर प्रदेश या राज्यांतील उती संवर्धन सुविधांचे भूमीपूजन, राष्ट्रीय सहकार डेटाबेस आणि जिओ-टॅग मोबाइल ॲप्लिकेशन तसंच राष्ट्रीय डेअरी विकास परिषदेच्या दूधपुरवठ्याशी संबंधित मिल्क सप्लाय रिव्ह्यू डॅशबोर्ड पोर्टलच्या लोकार्पणाचा समावेश आहे.
त्याशिवाय सहकार सीबीएस आणि सहकार सहयोगी या दोन प्रमुख उपक्रमांचा शुभारंभ शहा यांच्या हस्ते होणार आहे. या कार्यक्रमादरम्यान 50 हजार प्राथमिक कृषी पतसंस्थांचे इ-पॅक्समध्ये रूपांतर करण्यात येणार आहे. त्याचबरोबर, बियाण प्रणाली बळकट करण्यासाठी भारतीय बीज सहकारी समिती मर्यादित आणि भारतीय कृषी संशोधन परिषद म्हणजे आयसीएआरदरम्यान सामंजस्य करारही होणार आहे.

**ग्राहक संरक्षण**

स्वित्झर्लंडमध्ये आज होणाऱ्या ग्राहक संरक्षण कायदा आणि धोरण या विषयावरील नवव्या आंतर-सरकारी तज्ज्ञ गटाच्या सत्राचे अध्यक्षपद भारत भूषवणार आहे. संयुक्त राष्ट्राच्या व्यापार आणि विकास गटाकडून दोन दिवसांचे हे सत्र आयोजित केले आहे. ग्राहक व्यवहार, अन्न आणि सार्वजनिक वितरण मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, ग्राहक संरक्षण कायदा आणि धोरणातील आगामी मुद्द्यांवर चर्चा करण्यासाठी आयोजित या सत्रांमध्ये सदस्य देश, आंतरराष्ट्रीय संस्था, ग्राहक संरक्षण प्राधिकरणे, शैक्षणिक क्षेत्रातील तज्ज्ञ आणि इतर संबंधित घटक एकाच व्यासपीठावर येणार आहेत. भारताच्या ग्राहक व्यवहार विभागाच्या सचिव निधी खरे या सत्राचे अध्यक्षपद भूषवतील.

**ब्रिक्स महिला**

ब्रिक्स महिला कार्यगटाची दोन दिवसीय बैठक आजपासून केरळमध्ये सुरू होत असून, भारत परिषदेचे अध्यक्षस्थान भूषवणार आहे. ब्रिक्स सदस्य देशांमधील वरिष्ठ सरकारी अधिकारी एकत्रितपणे विविध क्षेत्रांतील महिला सक्षमीकरण आणि महिलांच्या नेतृत्वाखालील विकास यांसारख्या महत्त्वाच्या मुद्द्यावर चर्चा करणार आहेत.

**<u>ब्रिक्स बैठक</u>**

आसाममध्ये आजपासून ब्रिक्स देशांच्या अमली पदार्थ विरोधी संस्थांच्या प्रमुखांच्या दोन दिवसीय बैठकीचं आयोजन करण्यात आलं आहे. अमली पदार्थ विरोधी संस्थांचे प्रमुख आणि अधिकारी यात सहभागी होती. संस्थात्मक सातत्य बळकट करणे आणि अमली पदार्थ नियंत्रण संस्थांमध्ये कार्यचालन सहकार्य वाढवण्यावर यामध्ये भर देण्यात येणार आहे. अमली पदार्थांशी संबंधित भविष्यातील धोक्यांना दिला जाणारा सामूहिक प्रतिसाद बळकट कऱण्यावर लक्ष केंद्रित केले जाणार आहे.

**<u>श्यामा प्रसाद जयंती</u>**

भारतीय जनसंघाचे संस्थापक डॉक्टर श्यामा प्रसाद मुखर्जी यांची आज जयंती आहे. त्यांना आदरांजली अर्पण करण्यासाठी दोन वर्षांच्या स्मरण उत्सवाचं आयोजन करण्यात आलं होतं; त्याचाच एक भाग म्हणून कोलकाता इथं आज एका कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असतील. यावेळी मुखर्जी यांचा 125 फूट उंच पुतळा कोलकाता इथं उभारला जाणार आहे, त्याचं भूमिपूजन आज करण्यात येईल.

**<u>श्री राम जन्मभूमी</u>**

श्री राम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टच्या सदस्यांची आज बैठक होणार असून, त्यामध्ये विविध प्रशासकीय आणि आर्थिक बाबींसह ट्रस्टला मिळालेल्या देणग्यांसदर्भात विशेष तपास गटाच्या तपासातील निष्कर्षांवरही चर्चा होणार आहे. या बैठकीत सचिव चंपत राय आणि ट्रस्टचे सदस्य डॉ. अनिल मिश्रा यांच्या राजीनाम्यावरही विचारविनिमय होण्याची शक्यता आहे.

**<u>इन्स्टाग्राम नोटिस</u>**

केंद्र सरकारने लोकप्रिय समाज माध्यम इन्स्टाग्रामवरील सशुक्ल जाहिरातींमध्ये बाल लैंगिक शोषण आणि गैरवर्तणूक मजकूराच्या वापरसंदर्भात कडक भूमिका घेत मेटा कंपनीला नोटिस बजावली आहे. या सामग्रीला प्रोत्साहन देणाऱ्या आणि त्यांच्यापर्यंत पोहोचण्यास मदत करणाऱ्या सर्व जाहिराती आणि आशय बंद करण्याचे आदेश या नोटिसीद्वारे दिल्याचे अधिकारिक सूत्रांनी सांगितले आहे. या संदर्भात मेटाने सात दिवसांच्या आत सविस्तर स्पष्टीकरण द्यावे असेही इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाने बजावले आहे. या मंचाने मध्यस्थ म्हणून सुरक्षा मार्गदर्शक तत्वाचे पालन केले आहे की नाही याचा आढावा सरकार घेत आहे.

**<u>युरोप वणवे</u>**

युरोपात पोर्तुगालमध्ये, ग्रीस आणि स्पेनमध्ये भडकलेले वणवे विझवण्यासाठी आगीचे शेकडो बंब काल रात्रीपासून शर्थीचे प्रयत्न करत आहेत. पोर्तुगाल मध्ये वणव्यामुळे लागलेली प्रचंड मोठी आग अटोक्यात आणण्यासाठी तीन दिवसांहून अधिक काळ संघर्ष सुरू असल्यानं स्पेन आणि इटलीनंही तिथं आता मदतीसाठी आपली पथकं पाठवली आहेत. ग्रीसमधल्या थेस्सालोनिकी शहरातील रिसायकलिंग प्रकल्प या आगीनं वेढल्यामुळे प्लास्टिक जळून विषारी वायू पसरला आहे.

**<u>अमेरिका चक्रीवादळ</u>**

बावी नावाच्या चक्रीवादळानं अमेरिकेच्या पॅसिफिक बेटांना धडक दिली आहे. या वादळामुळे गुआम आणि नॉर्दन मारियाना बेटांवर सोसाट्याचा वारा आणि मुसळधार पावसाचा तडाखा बसला आहे. ताशी 290 किलोमीटर वेगाने हे वादळ पुढे सरकत आहे. बावी वादळ धोकादायक असून त्यामुळे मोठी हानी होण्याचा इशारा अमेरिकेच्या राष्ट्रीय हवामान सेवेने दिला आहे.
व्हेनेझुएला-पूल-मंजिरी

व्हेनेझुएलामध्ये नुकत्याच झालेल्या दुहेरी भूकंपात बळी पडलेल्यांची संख्या वाढून आता 3 हजार 342 वर पोहोचली आहे. 16 हजारांहून अधिक जण जखमी झाले असून 17 हजार लोक विस्थापित झाले आहेत. व्हेनेझुएलाच्या नॅशनल असेंब्लीच्या अध्यक्षांनी ही माहिती दिली. भूकंपग्रस्तांच्या मदतीसाठी 80 तात्पुरत्या छावण्या स्थापन करण्यात आल्या आहेत.

**फिफा विश्वकरंडक**

फिफा विश्वकरंडक स्पर्धेत, राउंड ऑफ 16 मध्ये ब्राझीलला नॉर्वेकडून 2-1 असा धक्कादायक पराभव पत्करावा लागला. ब्राझील स्पर्धेत पाच वेळा विश्वविजेता राहिला आहे. या पराभवानंतर ब्राझीलचा अनुभवी खेळाडून नेमार ज्युनियरने आंतरराष्ट्रीय फुटबॉलमधून निवृत्ती जाहीर केली आहे. ब्राझीलचा सर्वाधिक गोल करणारा हा खेळाडू म्हणून नेमार प्रसिद्ध होता.

**विंबलडन टेनिस**

विम्बल्डन टेनिस स्पर्धेत सरबियाच्या नोव्हाक जोकोविच ने रशियाच्या रोमन सफिउलिनचा पराभव करत पुरुष एकेरी यांच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश मिळवलं आहे. रोमांचकारी ठरलेली ही लढत 3 तास 26 मिनिटे चालली. या विजयामुळे जोकोविचचा हा ऑल इंग्लंड क्लबमधील 106 वा एकेरी विजय ठरला असून त्याने रॉजर फेडररचा विम्बल्डन पुरुष एकेरीतील 105 सामने विजयाचा विक्रम मागे टाकला.

**क्रिकेट**

आयसीसी महिला टी-20 विश्वकरंडक स्पर्धेत ऑस्ट्रेलियाचा संघ विश्वविजेता ठरला. अंतिम सामन्यात काल ऑस्ट्रेलियाने इंग्लंडचा सात गडी राखून पराभव केला. ऑस्ट्रेलियाने दिलेल्या 151 धावांचा पाठलाग करताना, 17 षटकं 1 चेंडूत 153 धावा केल्या. ऑस्ट्रेलियाच्या बेथ मूनी ने सर्वाधिक 64 धावा केल्या.

**महाराष्ट्र पाऊस**

महाराष्ट्रात मुंबई, पुण्यासह कोकणाला पावसानं कालपासून झोडपून काढलं आहे. मुंबई, ठाणे, रायगड जिल्ह्यासाठी हवामान विभागानं अतिमुसळधार पावसाचा इशारा जारी केला असून, कोकणात मुसळधार पावसाने जनजीवन विस्कळीत झालं आहे. मुंबईत मानखुर्द परिसरात एका चाळीत तीन घरं कोसळून पाच मुलांसह एका महिलेचा मृत्यू झाला. मुंबईत झाड पडण्याच्या घटनेत दोन जणांचा मृत्यू झाला. ठाणे, पालघर जिल्ह्यातही पावसामुळे दोन जणांचा मृत्यू झाला. कोकणातही मुसळधार पाऊस सुरू असून, रायगड जिल्ह्यातल्या कुंडलिका, अंबा, सावित्री, पातळगंगा या नद्यांनी धोका पातळी ओलांडली आहे. त्यामुळे निवासी भागात पूरसदृश्य परिस्थिती आहे. पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यातील पाटण गावात एका घरावर दरड कोसळल्याची घटना घडली. आपत्ती प्रतिसाद दलाची पथकं रवाना झाली असून, अधिक वृत्ताची प्रतीक्षा आहे.
दरम्यान, मुंबई-पुण्यात होणाऱ्या पावसामुळे मुंबई-पुणे वाहतूक ठप्प झाली असून, मुंबई पुणे द्रुतगती मार्ग, जुना मुंबई-पुणे महामार्ग पुढील आदेशापर्यंत बंद ठेवण्यात आला आहे. नागरिकांनी पुण्यामुंबईचा प्रवास टाळावा असं आवाहन प्रशासनानं केलं आहे.

**केरळ पाऊस**

केरळमध्ये कन्नूर आणि कासारगोड जिल्ह्यांत अति मुसळधार पावसाची शक्यता असून दक्षतेचा केशरी बावटा जारी करण्यात आला आहे. तर इतर सहा जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसाची शक्यता व्यक्त केली आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.